त्यांचे, राजीनाम्याबाबत जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे विवाद उपस्थित झालेला नाही व निम्यापेक्षा जास्त जागा रिक्त झाल्यामुळे मी, कृ. भि. भोगे, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४५ (१-अ) अन्वे व संदर्भ क्रमांक १ अन्वये प्राप्त अधिकारानुसार ग्रामपंचायत कंधारेवाडी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड या आदेशाद्वारे विघटन करीत आहे.

तसेच श्री. जे. डी. मंगनाळे, ग्रामसेवक यांची ग्राम पंचायत कंधारेवाडी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड येथे प्रशासक म्हणून नेमणूक करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. या आदेशाची अमलबजावणी हे आदेश राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून करण्यात यावी.

कृ. भि. भोगे,
विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

औरंगाबाद, २४ जानेवारी २००५.

---

२

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांजकडून

महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१.

क्रमांक का ४/प्र.क्र.-४३७६/भेट कार्यालय/२००५/७४.– ज्याअर्थी, महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ चे नियम ३ च्या शक्तीचा वापर करुन नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे निर्देशित करीत आहेत की, दिनांक ५ फेब्रुवारी २००५ पासून दुय्यम निबंधक अंबड, जिल्हा जालना हे आपले कार्यालय प्रत्येक आठवड्यातून मंगळवार व बुधवार या २ दिवशी (सुटीचे दिवस सोडून) घनसावंगी येथे भरवतील (भेट देतील).

ओ. पी. गुप्ता,
नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे .

पुणे, १४ जानेवारी २००५.

---

**विभागीय आयुक्त औरंगाबाद यांज कडुन**
**जिल्हा लातूर.**

**महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये कलम ११ (१) ची अधिसुचना :–**

(१) क्रमांक २००४/पुनर्वसन/कक्ष-१/सिआर- १० महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद असे जाहिर करतो की, महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन १९९९ च्या अधिनियमातील तरतुदी या व्दारे लातूर जिल्हयाच्या चाकुर तालुक्यातील फत्तुनाईक तांडा साठवण तलावास उक्त अधिनियमाच्या कलम (१) खंड (अ) व खंड (ब) च्या तरतुदींच्या अनुरोधाने उक्त अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील. त्या प्रकल्पाच्या संबंधात या व्दारे ...

(अ) उक्त प्रकल्पाच्या बाधीत किंवा लाभधारक परीमंडळामध्ये येण्याची शक्यता आहे अशी गांवे खालील प्रमाणे विनिर्दीष्ट करीत आहे..

(एक) बाधित परिमंडळात येण्याचा संभव असणारी गांवे..

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुक्याचे नांव | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अंबुलगा | चाकूर | लातूर |
| २ | घरणी | चाकूर | लातूर |
| ३ | नळेगांव | चाकूर | लातूर |

(दोन) लाभधारक परिमंडळात येण्याचा संभव असलेली गांवे...

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुक्याचे नांव | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अंबुलगा | चाकूर | लातूर |
| २ | घरणी | चाकूर | लातूर |
| ३ | नळेगांव | चाकूर | लातूर |

(ब) वरील परिच्छेद अ मधील (एक) आणि (दोन) मध्ये नमूद केलेल्या गांवातील एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण धारण क्षेत्राला किंवा त्यांच्या भागाला लागू असल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध अशा गावातील किंवा क्षेत्रातील निर्देशीत धारण क्षेत्राला तात्पुरते लागू होतील. मात्र संबंधीत परिमंडळातील त्यांच्या एकुण धारण जमीनीचे क्षेत्र ३.२३ हे.आर. पेक्षा कमी असता कामा नये.

(२) विभागीय आयुक्त असाही निर्देश देत आहे की, ही अधिसुचना संबंधीत गावामध्ये दवंडी पिटवून बाधित किंवा लाभ मिळालेल्या परिमंडळातील एखाद्या किंवा अनेक ठळक जागी गावांच्या चावडीवर आणि कोणतेही ग्रामपंचायत असल्यास ग्रामपंचायतीच्या कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रकल्प अधिकारी व आयुक्त कार्यालयात देखील ठळक जागेवर किंवा जागांवर या अधिसुचनेची प्रत चिकटवून लातूर जिल्हाधिकाऱ्यांकडून सदर अधिसुचना प्रसिध्द करण्यात येईल किंवा करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(कृ.भि.भोगे)
विभागीय आयुक्त औरंगाबाद

दिनांक :– ३० डिसेंबर २००४.